वर्ष : ०५ | अंक: ०३ | मुंबई, मंगळवार ११ डिसेंबर २०१८ ते १७ डिसेंबर २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादकः- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 'अदानी'ने वाढीव बिले दिल्याचे उघड!

3 → वाहनांच्या संख्येवर निर्बंध घालण्याची वेळ आली!

राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढणार! ← 4

# आरक्षणाच्या आडून 'समाजांमध्ये वाद'




**पुणे - राज्यांतील जाती-जातींमधील अंतर वाढविण्याचे चित्र सध्या दिसत असून महाराष्ट्रात आरक्षणाच्या आडून मराठा आणि ओबीसी वाद पेटविण्यात येत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. 'राजस्थानात रजपूत, गुजरातमध्ये पाटीदार तसेच आंध्र प्रदेशातही जाती-जातींमधील अंतर वाढविण्यात येत आहे. महाराष्ट्रात मराठा आणि ओबीसींमध्ये असाच प्रयत्न केला जात असला, तरी तो होऊ देणार नाही. कितीही गैरसमज निर्माण केले, तरी ते दूर करत एकमेकांचे प्रश्न सोडवू,' असेही पवार म्हणाले.**



राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आयोजित 'निर्धार विजयाचा-लक्ष २०१९' या मेळाव्यात पवार बोलत होते. राजस्थान, गुजरात, आंध्र प्रदेश यापाठोपाठ आता महाराष्ट्रातही जातींमधील अंतर वाढविण्याचा प्रयत्न होतो आहे. एकीकडे आरक्षण सोडविण्याची भूमिका वादातीत कशी राहील, याची काळजी घेतली जाते. मात्र, त्याचवेळी राज्यात मराठा-ओबीसींमध्ये वाद पेटविला जात असल्याचा आरोप पवार यांनी केला.

'मराठा आरक्षणाच्या निर्णयानंतर जल्लोष करा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतात, मात्र त्याचवेळी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अमित शहा हे तेलंगणात आरक्षणाची मागणी वेडेपणाची असल्याचे म्हणतात. तसेच, ५० टक्क्यांवरील आरक्षणाची मागणी ही कोर्टात टिकणार नसल्याचेही म्हणतात. मग जनतेला खोटे आश्वासन का दिले? अशा परिस्थितीत जातींमधील अंतर वाढणार नाही, हे पाहणे सगळ्यांची जबाबदारी आहे' असेही पवार यांनी नमूद केले.

दुष्काळप्रश्नी सरकार असंवेदनशील असल्याचा आरोप पवारांनी केला. 'दुष्काळाचे सावट असून गुरेढोरे संकटात आहेत. त्यांना आधार दिला पाहिजे, असा विचारच सरकारच्या मनात नसल्याने काळजी वाटते. आपण सरकारमध्ये असताना दुष्काळाचे चित्र जाणवले तरी त्या राज्यात जाऊन आठ दिवसांच्या आत दिल्लीत बैठक घेत होतो. त्यानंतर संबंधित राज्याला मदतीसाठी पाठपुरावा करत होतो. मात्र, सध्याचे सरकार या वर्गाकडे आस्थेने बघत नसल्याने जनतेची होरपळ होईल,' अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.




# शेअर बाजारमध्ये भूकंप

## सेन्सेक्स ५०० अंकांनी गडगडला





***मुंबईः उद्या मंगळवारी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल लागणार आहेत. त्यापैकी काही राज्यांत भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता असल्याने भाजपच्या गोटात खळबळ माजलेली असतानाच शेअर बाजारावरही त्याचा परिणाम झाला आहे. निवडणूक निकालाच्या आधीच शेअर बाजारात हाहाकार उडाला असून सेन्सेक्स तब्बल ६१५ अंकांनी गडगडला आहे. एक्जिट पोल भाजपा सरकारच्या विरोधात गेल्यामुळे सोमवारी शेअर बाजारात मोठी घसरण दिसून आली. सेन्सेक्स सकाळी ४७८.५९ अंकानी घसरुन ३५,२०४.६६ वर सुरु झाला. तर निफ्टीमध्येही १८५ अंकाची घसरण झाली. निफ्टीची १०,५०८.७० अंकावर सुरुवात झाली.***

सेन्सेक्स सोमवारी सकाळी ६१५ अंकांनी घसरून ३५,०५८.७६ वर सुरू झाला. तर निफ्टीमध्ये १९३.५५ अंकाची घसरण होत १०,५०० अंकावर गडगडला. तसेच बँकिंग सेक्टरच्या शेअरमध्ये सतत घसरण सुरू होती. याशिवाय विप्रो, ॲक्सिस बँक, इंडस्लँड बँक, पॉवर ग्रीड, ओएनजीसी, एचडीएफसी बँक, आयटीसी, एल अँड टी, टाटा स्टिल, एनटीपीसी, एसबीआयएन आणि हिरो मोटोकॉपच्या शेअरमध्ये घसरण झाली आहे.

विशेष म्हणजे शुक्रवारी शेअर बाजाराने दिवसभर चांगली कामगिरी केली होती. शुक्रवारी सेन्सेक्स ३६१ अंकांच्या तेजीसह ३५,६७३ वर तर निफ्टी ९२ अंकाच्या तेजीसह १०,६९३ वर बंद झाला होता. मतदानानंतर आलेल्या एक्झिटपोलमध्ये राजस्थानमध्ये भाजपचं पानीपत होणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. तर मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसबरोबर अटीतटीची लढत होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याचबरोबर तेलंगणा आणि मिझोराममध्ये झालेल्या निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार असल्याने या पाचही राज्यांच्या निकालांकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागले आहे. या पाचही राज्यात भाजपला अपेक्षित यश मिळण्याची चिन्हे दिसत नसल्याने त्याचा परिणाम शेअर मार्केटवरीह झाल्याचं सांगण्यात येतं.

# मला भारतात न्याय मिळणार नाही



**लंडनः** निष्पक्ष सुनावणीचा अभाव आणि राजकीय स्वार्थासाठी राजकारण्यांनी केलेल्या आरोपांमुळे मला भारतात न्याय मिळणार नाही अशी भीती किंगफिशरचे सर्वेसर्वा विजय मल्ल्या यांनी व्यक्त केली आहे. मल्ल्यांना भारताच्या ताब्यात द्यायचं की नाही याबाबत आज महत्त्वपूर्ण निर्णय इंग्लंडमधील उच्च न्यायालय देणार आहे.

२०१६मध्ये भारतीय बँकांचे हजारो कोटींचे कर्ज बुडवून मल्ल्या इंग्लंडमध्ये पळून गेला होता. त्यानंतर त्याला भारतात आणण्यासाठी भारतीय बँकांनी ब्रिटनच्या उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यासंदर्भात आज ब्रिटनमधील कोर्टात सुनावणी होणार आहे. यासंदर्भात टाइम्स ऑफ इंडियाने मल्याची मुलाखत घेतली आहे. भारतात येण्याबद्दल प्रश्न विचारला असता मल्ल्या म्हणाला'मला भारतात न्याय मिळणार नाही याची भीती वाटते. कर्नाटक उच्च न्यायालयासमोर मी १४,००० कोटींच्या ठेवी ठेवल्या होत्या. त्यातून कर्ज फेडली जावी अशी विनंती ही केली होती. पण कर्नाटक न्यायालयाने माझी मागणी मान्य केली नाही'.

# 'पिशवीबंदी'मुळे दूध १३ रुपयांनी महागणार?

***कोल्हापूर : राज्य सरकारने पॉलिथीन पिशवी निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर कारवाईचे हत्यार उपसल्याने त्यांनी उत्पादन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा परिणाम दूध वितरणावर होणार असल्याने दूध संघांपुढे आता 'टेट्रा पॅक' व काचेच्या बाटलीचा पर्याय आहे; पण टेट्रा पॅक पॅकिंगमधील दुधाची चव बदलणार आहेच पण त्यासाठी ग्राहकांना लिटरमागे किमान १३ रुपये जादा मोजावे लागण्याची शक्यता आहे.***



राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने पॉलिथीन फिल्म उद्योगावर कडक कारवाई केली जाणार असल्याने संबंधित कंपन्यांनी १५ डिसेंबरपासून उत्पादन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. पिशवीतून रोज साधारणतः दोन ते अडीच कोटी लिटर दुधाचे वितरण होते. कंपन्यांनी उत्पादन बंद केले तर वितरणाचा पेच निर्माण होऊ शकतो.

पहिला पर्याय पूर्वीप्रमाणे काचेच्या बाटलीतून दूध वितरण करावे लागणार आहे; पण बाटली हाताळणे जोखमीचे आहेच, बाटल्या स्वच्छ धुतल्या नाही तर बॅक्टरिया तयार होतो.

दुसरा पर्याय 'टेट्रा पॅक' चा आहे, हे पॅकिंग सात स्तरांच्या आवरणाने बनलेले असते. त्यामध्ये १३५ डिग्री तापमानाचे दूध भरावे लागते. हे दूध सहा महिन्यांपर्यंत टिकाऊ असले तरी त्याची चव पिशवीतील दुधापेक्षा वेगळी लागते. त्याशिवाय पॅकिंग व प्रक्रियाखर्च वाढतो. त्यातून प्रतिलिटर ६५ रुपये मोजावे लागू शकतात.

# भीक मागत नाही

## राम मंदिरासाठी कायदा करा: RSS



**नवी दिल्लीः - संसदेच्या हिवाळी अधिवेशनाआधी राम मंदिरप्रश्नी अध्यादेश लागू करण्यासाठी मोदी सरकारवर दबाव आणण्याचे हिंदू संघटनांचे प्रयत्न सुरुच आहेत. राम मंदिर उभारणीच्या मागणीसाठी आज विश्व हिंदू परिषदेचे (VHP) हजारो कार्यकर्ते रामलीला मैदानावर धडकले. या कार्यकर्त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी संबोधित केलं. 'राम मंदिरासाठी भीक मागत नाही, कायदा करावा,' असा म्हणत त्यांनी मोदी सरकारला अल्टिमेटम दिला.**

अयोध्या खटल्यावर सर्वोच्च न्यायालयानं केलेल्या टिप्पणीवरही जोशी यांनी भाष्य केलं. न्यायालयानं आपली प्रतिष्ठा कायम राखली पाहिजे. लोकांच्या भावनेचा आदर करायला हवा, असंही ते म्हणाले. यावेळी त्यांनी मोदी सरकारवरही निशाणा साधला. सत्तेत बसणाऱ्या लोकांनी राम मंदिर बांधण्याची घोषणा केली. आता हे आश्वासन पाळण्याची वेळ आली आहे. सरकारनं सोडलेला संकल्प पूर्ण करायला हवा. सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या भावनांचा आदर करायला हवा. आम्ही भीक मागत नाही, अशा शब्दांत त्यांनी सरकारला सुनावलं.

संसदेच्या अधिवेशनाआधीच व्हीएचपीनं राम मंदिर उभारणीच्या मागणीसाठी रविवारी दिल्लीत रॅली काढली. यात हजारो कार्यकर्ते सहभागी झाले. केंद्र सरकारनं राम मंदिर उभारणीसाठी कायदा करावा, अशी मागणी या रॅलीद्वारे केली.

# अदानीच्या गुजराती वीजबिलावर मराठी एकीकरण समितीचा आक्षेप

**भाईंदर-** मुंबई उपनगरात सध्या अदानी इलेक्ट्रीसिटी या खासगी कंपनीमार्फत वीजपुरवठा केला जातो. या कंपनीने ग्राहकांच्या सोईनुसार भाषा



निवडीला प्राधान्य देत मीरा-भाईंदर शहरात गुजराती भाषेतील विद्युत बीले मोठ्या प्रमाणात वितरीत करण्यास सुरुवात केली. त्यावर तीव्र आक्षेप घेत मराठी एकीकरण समितीने कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट घेत, विद्युत बीले केवळ मराठी भाषेतच काढावीत, अशी मागणी केली आहे.

शहरात अगोदरच मराठी टक्का घसरत असल्याची ओरड होत असली तरी, मराठी भाषेला प्राधान्य देण्यासाठी सरकारी यंत्रणा अनुत्सूक असल्याचे अनेकदा समोर आले आहे. त्यासाठी समितीने पुढाकार घेत अनेक सरकारी यंत्रणांतील परप्रांतीय भाषेच्या वापरावर आक्षेप घेत मराठी भाषेलाच प्राधान्य देण्यासाठी चळवळ सुरू केली. दरम्यान, मुंबई उपनगरात वीजपुरवठा करणारी पुर्वाश्रमीची रिलायन्स एनर्जी कंपनी ताब्यात घेतल्यानंतर अदानी इलेक्ट्रीसिटी कंपनीनेसुद्धा तोच पायंडा पाडण्यास सुरुवात केली आहे.

कंपनीने ग्राहकांना भाषा निवडीचे प्राधान्य देणे सुरू केल्याने परप्रांतिय भाषिकांकडून राज्यातील मराठी भाषा वापरावर गडांतर येण्याची भिती समितीने व्यक्त केली जात आहे. समितीने अदानीच्या या अमराठी भाषा निवडीच्या उपक्रमाला तीव्र विरोध केला आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर

# पुन्हा देवेंद्र प्रसन्न... धुळे, नगरमध्ये भाजपाची मुसंडी!

**धुळे- महाराष्ट्रातील महापालिकांमध्ये भाजपाचं 'कमळ' फुलण्याचा सिलसिला धुळे आणि अहमदनगर महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्येही पाहायला मिळतोय. काँग्रेस-राष्ट्रवादीचा हातात हात आणि शिवसेनेनं सोडलेली साथ, अशा परिस्थितीतही भाजपाने धुळे आणि नगरमध्ये मुसंडी मारली आहे.**



२०१३ साली झालेल्या धुळे महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला फक्त तीन जागा मिळाल्या होत्या. अहमदनगरमध्येही त्यांचे फक्त नऊ नगरसेवक होते. परंतु, आज सकाळपासून सुरू झालेल्या मतमोजणीत भाजपाने धुळ्यात ३० जागांचा टप्पा ओलांडला आहे, तर नगरमध्ये १९ जागांवर आघाडी घेतलीय. अनिल गोटे यांनी बंडाचा झेंडा फडकवल्यानं काँग्रेस आघाडीसह, शिवसेनेच्याही आशा पल्लवित झाल्या होत्या. परंतु, लोकसंग्राम पक्षाला मतदारांनी साफ नाकारलंय. त्यातून अनिल गोटेंबद्दलची नाराजी दिसते. त्यामुळे त्यांचं बंड भाजपाच्या पथ्यावरच पडल्याचं मानलं जातंय. तसंच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरील मतदारांचा विश्वास, या निकालांमधून पुन्हा सिद्ध झाला आहे. मराठा आरक्षणही भाजपाला फळल्याचं जाणकारांचं मत आहे.

# 'अदानी'ने वाढीव बिले दिल्याचे उघड!

## चौकशीसाठी द्विसदस्य समितीची नियुक्ती



**मुंबई -** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि. कंपनीने उपनगरातील वीजग्राहकांना नियमित दरापेक्षा वाढीव दरानेच वीज बिले आकारल्याचे शुक्रवारी स्पष्ट झाले असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी वीज नियामक आयोगाने द्विसदस्य समिती नेमली आहे.

आयोगाचे अध्यक्ष आनंद कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मुंबई उपनगरातील अदानी कंपनीच्या ग्राहकांना नोव्हेंबरमध्ये नियमित दरापेक्षा वाढीव दराने वीज बिले आल्यानंतर एकच गोंधळ उडाला होता. अदानी कंपनीच्या २७ लाख ग्राहकांपैकी जवळपास एक लाख १० हजार निवासी ग्राहकांना १० ते २० टक्क्यांपर्यंत वाढीव दराची वीज देयके प्राप्त झाल्याचे समोर आले आहे. त्याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची स्वत:हून दखल घेत आयोगाने अदानी कंपनीकडून स्पष्टीकरण मागविले होते.

त्यावर कंपनीने आपली भूमिका स्पष्ट करताना ऑक्टोबर महिन्यातील उष्म्यामुळे अधिक वीज वापरली गेली असून मागील देय इंधन समायोजन आकारांचा (एफएसी) काही हिस्सा या वीजदेयकामधून वसूल करण्यात आल्याचे आपल्या खुलाशात म्हटले. तसेच रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडून अदानी कंपनीकडे वितरण परवान्याच्या मालकीचे हस्तांतरण होताना कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामुळे मीटर रीडिंग घेण्यात आलेले नसल्यामुळे सुमारे साडेतीन लाख ग्राहकांची वीजदेयके सरासरी वापराच्या तत्त्वावर पाठविण्यात आल्याची कबुलीही कंपनीने दिली आहे. मात्र अदानी कंपनीच्या स्पष्टीकरणावर आयोग समाधानी नसून प्राथमिक माहितीवरून ऑक्टोबरच्या वीजदेयकांमध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी आयोगाने नेमलेल्या चौकशी समितीत माहिती आयुक्त अजित कुमार जैन आणि तांत्रिक विषयातील तज्ज्ञ तसेच आयोगाचे माजी सदस्य विजय सोनवणे यांचा समावेश आहे. ही समिती अदानी कंपनीबरोबरच बेस्ट, टाटा पॉवर, महावितरण अशा अन्य वीज वितरण कंपन्यांनी शहर आणि उपनगरातील वीजग्राहकांना या कालावधीत दिलेल्या देयकांचाही तुलनात्मक अभ्यास करील. अदानी कंपनीच्या विद्युतदेयकांमधील आकस्मिक दरवाढीची कारणे शोधून काढण्यासह भविष्यात असे प्रकार होऊ नयेत याबाबतच्या उपाययोजनांबाबतची शिफारसही ही समिती करेल. समिती दोन ते तीन महिन्यांत आयोगाला आपला अहवाल देईल, असेही कुलकर्णी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला आयोगाचे सदस्य मुकेश खुल्लर आणि आय. एम. बोहरी उपस्थित होते.

यापुढील वीजदेयके योग्य दराने वितरित व्हावीत यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून आयोगाने कंपनीस निर्देश दिले असून आयोगाच्या सप्टेंबर २०१८ च्या आदेशाप्रमाणे अदानी कंपनीने सरासरी ०.२४ टक्के वाढीपेक्षा अधिक दराने आकारणी करू नये अशी मर्यादा घालून दिली आहे.

त्याचप्रमाणे बिलांची दुरुस्ती करण्यासाठी अधिक शिबिरे आयोजित करून वाढीव विद्युतदेयकाबाबतच्या तक्रारींचे निराकरण करावे, असे निर्देशही दिल्याचे कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले. आयोगाच्या या निर्देशांचे अदानी कंपनीने स्वागत केले असून या निर्देशांचे पालन कंपनी करील, असे म्हटले आहे. विद्युत आयोग अदानीच्या दबावाखाली काम करीत असून आयोगाचे अध्यक्ष कुलकर्णी यांना हटवावे, अशी मागणी मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष संजय निरुपम यांनी केली आहे.

# बदली टाळल्यास वेतन बंद

**मुंबई -** बदली झाल्यानंतरही नव्या ठिकाणी रुजू न होता जुन्याच विभागांत ठिय्या मांडून बसणारे पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन बंद करण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी दिले आहेत. त्यामुळे आता प्रशासनाने अशा अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याची तयारी सुरू केली आहे.



भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जाऊ नये म्हणून पालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची दर तीन वर्षांनी बदली करण्यात येते. मात्र पालिकेच्या विविध विभागांमध्ये एकाच पदावर अनेक अधिकारी, कर्मचारी वर्षांनुवर्षे ठिय्या मांडून बसले आहेत. तर वरिष्ठांच्या मर्जीतील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांची त्याच विभागात केवळ एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर तांत्रिकदृष्ट्या बदली करण्यात येते. मात्र ही मंडळी त्याच विभागात पूर्वीप्रमाणेच काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहेत.

पालिकेच्या विविध विभागांमधील काही मंडळींना राजकीय वरदहस्त लाभला आहे. त्यामुळे त्यांची बदली करण्यास सामान्य प्रशासन धजावत नाही. बदली झालीच तर राजकीय नेत्यांकडून ती रोखण्याचे जोरदार प्रयत्न केले जातात. राजकीय दबाव डावलून संबंधितांच्या बदलीचे आदेश जारी झाल्यानंतरही नव्या विभागात रुजू होण्याऐवजी ही मंडळी त्याच कार्यालयात ठिय्या मांडून बसतात. पालिकेतील बदली टाळणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे.

कमला मिलमधील आगीनंतर जी-दक्षिण विभाग कार्यालयात वर्षांनुवर्षे एकाच पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मुद्दा ऐरणीवर आला होता. रस्ते, जल, घनकचरा, अनुज्ञापन, अतिक्रमण निर्मूलन आदी विभागांमध्ये बदली झाल्यानंतरही अनेक जण पूर्वीच्याच विभागांत ठाम मांडून बसले आहेत. या प्रकाराची आयुक्त अजोय मेहता यांनी गंभीर दखल घेतली आहे.

# आम्ही दत्तकाच्या जोरावर घर चालवत नाही; मुख्यमंत्र्यांवर शरद पवारांची टीका

**मुंबई -** नाशिक जिल्हा दत्तक घेतल्याचे मुख्यमंत्र्यांचे विधान वाचून मला मोठी गंमत वाटली होती. आम्हाला माहीत होते की हे दत्तक विधान काही टिकणार नाही. त्यामुळे यापुढे अशा दत्तक बापावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.



नाशिकमधील माजी मंत्री प्रशांत हिरे, माजी आमदार अपूर्व हिरे आणि अद्वैत हिरे यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. नाशिक महापालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी विकासासाठी नाशिक दत्तक घेतल्याचे विधान केले होते. याचा संदर्भ घेत पवारांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला.

बाहेरच्या दत्तकाच्या जोरावर आम्ही घर चालवत नाही, अशी टीका करतानाच आपला खराखुरा बाप शेतकरी आहे तोच आपला खरा घटक आहे. त्याच्या मदतीने पुढे जाऊया, असेही पवार म्हणाले. हिरे कुटुंबीयांची विचारधारा चांगली आहे. ते दुसऱ्या पक्षात गेले तो अपघात होता. त्या अपघातातून सावरून त्यांनी त्यांची गाडी योग्य वळणावर आणली आहे. भुजबळांना बळ देण्यासाठी हे दोन्ही तरुण नेते आता उभे ठाकले असल्याचेही पवार म्हणाले.

# म्हाडाची अनामत रक्कम घटणार

**मुंबई - म्हाडाकडून भविष्यातील घरांच्या सोडतीत एकाच गटांतील अर्जदारांना त्याच अनामत रकमेत वेगवेगळ्या प्रकल्पांतील घरांसाठी अर्ज करण्याची नवीन सुविधा उपलब्ध होणार आहे. घरांच्या सोडतीसाठी अनामत रक्कमही कमी होणार आहे. त्यामुळे एकाच अर्जापुरती अनामत रक्कम भरतानाही अर्जदारांची उडणारी तारांबळ आता संपुष्टात येईल. १६ डिसेंबर रोजी म्हाडाच्या १,३८४ घरांसाठी जाहीर होणारी सोडत १०० टक्के पारदर्शक पद्धतीने पार पडेल, असा विश्वास शुक्रवारी म्हाडातर्फे व्यक्त करण्यात आला.**




म्हाडा आणि घरांची सोडत हा जिव्हाळ्याचा विषय असल्याने प्राधिकरणाने मानवी हस्तक्षेपाशिवाय सोडत कशाप्रकारे जाहीर करण्यात येईल, याची माहिती दिली. घरांची सोडत काढताना ती पूर्णपणे पारदर्शक असण्याविषयी आग्रही भूमिका असून, त्या दृष्टीने अद्ययावत तयारी करण्यात आल्याचे म्हाडाचे अध्यक्ष उदय सामंत यांनी स्पष्ट केले. घरांच्या सोडतीत अर्ज भरताना अनामत रक्कम कमी करण्याबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत विचारविनिमय होउन निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे अनामत अर्ज रक्कमेसाठीही कर्ज घ्यावा लागणाऱ्या हजारो इच्छुकांपुढील आर्थिक ताण कमी होईल.

त्याचबरोबर एकाच आर्थिक गटातील अर्जदारांना निरनिराळ्या भागांतील गृहसंकुलातील घरांसाठी स्वतंत्रपणे अनामत रक्कम भरण्याची मुभा देण्यात येणार आहे. एकाच आर्थिक गटातील इच्छुकांना सोडतीत क्रमांक न लागल्यास वर्षांनुवर्षे प्रतीक्षा करावी लागते. त्याची दखल घेत त्यातही बदल करण्याचा निर्णय घेतला जाईल, सामंत यांनी नमूद केले. सध्याच्या प्रतीक्षा यादीत असलेले एकास एक पद्धतीचे प्रमाण वाढवले जाईल.

**दलालांपासून सावध राहावे**

संभाव्य फसवणूक लक्षात घेत इच्छुकांनी दलालांपासून सावध राहण्याचे आवाहन सामंत यांनी केले आहे. त्याचप्रमाणे दलालांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षता अधिकाऱ्यांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता असून त्यासाठी सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

# आता जात वैधता प्रमाणपत्राची तयारी अकरावीतच

**मुंबई -** बारावीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आल्याने यंदा प्रमाणपत्रासाठी बऱ्याच विद्यार्थी-पालकांची धावाधाव झाली. विद्यार्थी व पालकांची ही गैरसोय टाळण्यासाठी यापुढे दहावीनंतर महाविद्यालयात प्रवेश घेतानाच विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याच्या सूचना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून (बार्टी) शिक्षण विभागाला देण्यात आल्या आहेत. बार्टीने दिलेल्या आदेशानुससार शिक्षण विभागाने राज्याच्या जिल्ह्यातील संबंधित सर्व खासगी अनुदानित / विना अनुदानित / स्वयं अर्थसाहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य व मुख्याध्यापकांना सूचना दिल्या आहेत.




जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विद्यार्थी / उमेदवारांनी अर्ज केल्यानंतर त्याची पूर्ण पडताळणी होऊन प्रमाणपत्र मिळण्यासाठी ३ महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. कधीकधी यासाठी आणखी वेळ होऊन विद्यार्थ्यांना मुदतीमध्ये प्रमाणपत्र प्रवेश घ्यायच्या संस्थांमध्ये सादर करणे जिकिरीचे होऊन जाते. हे टाळण्यासाठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांतील विद्यार्थ्यांनी १० वी पास झाल्यानंतर अकरावी विज्ञानामध्ये प्रवेश घेतेवेळीच आपला जात वैधता प्रमाणपत्रासाठीचा अर्ज ऑनलाइन भरण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थी हित लक्षात घेऊन त्यानुसार घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे पडताळणीसाठी समितीलाही पुरेसा वेळ मिळून विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र बारावी पास होण्याच्या आधी मिळू शकेल आणि ऐनवेळी व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशावेळी विद्यार्थी, पालकांची धावाधाव होणार नाही.

# मुंबई आणि परिसरात कारचोरांचा सुळसुळाट

## महागडी वाहने लक्ष्य; संघटित गुन्हेगारीचा पोलिसांना संशय

**मुंबई -** मुंबई आणि परिसरात कारचोरांचा सुळसुळाट झाल्याचे वाढत्या तक्रारींवरून निदर्शनास आले आहे. एकाच आठवड्यात मुंबई, पुण्यातून पाच टोयोटा फॉर्च्युनर कार चोरण्यात आल्या आहेत. वाहन चोरांच्या संघटित गुन्हेगारीचा अनुभव असल्यामुळे गंभीर गुन्ह्यांत वापर होण्याआधी कार, चोरांना हुडकून काढण्यासाठी पोलिसांनी धडपड सुरू केली आहे.

मुंबईतील वांद्रे, वर्सोवा, सांताक्रूज परिसरातून एका आठवड्यात फॉर्च्युनर, इनोव्हा, स्कॉर्पिओ अशी पाच वाहने चोरीला गेली. त्याच वेळी पुणे शहरातूनही चोरट्यांनी दोन फॉर्च्युनर पळवल्या. एरव्ही इनोव्हा, स्विफ्ट, तवेरा या कारच्या चोरीला जाण्याचे प्रमाण मोठे असते. त्यामुळे चोरांनी एकाच आठवड्याात दोन शहरांमधून पाच फॉर्च्युनर का चोरल्या, हा योगायोग होता की एकच टोळी विशिष्ट उद्देशाने चोऱ्या करत आहे, या प्रश्नांची उत्तरे पोलीस शोधत आहेत.



एकाच चावीने दार उघडता येईल आणि इंजिनही सुरू होईल (सिंगल की सिस्टीम) अशा कार चोरांसाठी सहज लक्ष्य ठरतात. हे ओळखून वाहननिर्मिती कंपन्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या. डिजिटल की, बोटाचा ठसा ओळखून प्रतिसाद देणारी यंत्रणा या त्यातल्याच काही योजना. पण यातल्या बहुतांश उपाययोजनांचे संरक्षक कडे भेदून वाहन चोऱ्या होत आहेत. फॉर्च्युनर कारला डिजिटल की आहे. चावी आणि इंजिन एका बार कोडने बांधलेले असतात. त्यामुळे बनावट चावी तयार करून कार चोरणे निव्वळ अशक्य असते. अशा परिस्थितीत बार कोड ओळखून इंजिन सुरू करणाऱ्या ईसीएम यंत्रावरच चोरांच्या टोळ्या हल्ला करतात. हे यंत्र काढतात. स्वत:कडील ईसीएम यंत्र बसवून वाहन चोरतात. एखाद्या वाहनाचा बार कोड काय हे लांबून ओळखू शकेल, अशी परदेशी उपकरणे (ऑटो की प्रोग्रामर) चोरांच्या टोळीकडे आहेत. त्यामुळे ते दोन मिनिटांत अद्ययावत यंत्रणा मोडून अशा महागड्या कार चोरू शकतात. मुंबई, पुण्यातील फॉर्च्युनर अशाच प्रकारे चोरी झाल्या असाव्या, असा अंदाज अनुभवी पोलीस अधिकारी व्यक्त करत आहेत.

## माधुरी दीक्षित निवडणूक लढवणार नाही

**मुंबई -** आपण राजकारणात येणार असल्याच्या बातम्यांचं बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित हिने खंडन केलं आहे. आगामी लोकसभेसाठी भाजप तिला पुण्यातून लोकसभेची उमेदवारी देणार अशा बातम्या पसरल्या होत्या.

माधुरीचा प्रवक्ता म्हणाला, 'या सर्व बातम्या खोट्या आणि काल्पनिक आहेत.' भाजपचे अध्यक्ष अमित शाह यांनी यावर्षीच्या जून महिन्यात माधुरीची 'संपर्कासाठी समर्थन' मोहीमेंतर्गत भेट घेतली होती. भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने गुरुवारी बातमी दिली होती की माधुरीचं नाव पुणे लोकसभेसाठी भाजपच्या उमेदवार म्हणून नक्की करण्यात आलं आहे.

# भूज-दादर एक्स्प्रेसमध्ये महिलेची गळा चिरुन हत्या



**मुंबई -** सूरतहूनमुंबईकडे येणाऱ्या भूज-दादर एक्स्प्रेसमध्ये एका ४० वर्षीय महिलेची धारदार शस्त्रानं हत्या करण्यात आल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. थरकाप उडवणारी ही घटना महिलांच्या डब्यात घडली आहे. आरपीएफचे जवान गाडी चेक करत असताना त्यांना रक्ताच्या थारोळ्यात एका महिलेचा मृतदेह आढळला. मृत महिलेचं नाव दाडिया देवी शंकर चौधरी असे आहे. दाडिया देवी यांच्या गळ्यावर, दोन्ही हातावर आणि छातीवर शस्त्रानं वार करण्यात आलेल्या गंभीर जखमी आढळून आल्या आहेत.

याप्रकरणी मुंबई सेंट्रल जीआरपीएफनं हत्येचा गुन्हा नोंदवला आहे. लुटमारीच्या उद्देशानं दाडिया देवी यांची हत्या करण्यात आली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

आरपीएफचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र यांनी दिलेल्या माहितीनुसार, दाडिया देवी या सूरतमधील रहिवासी होत्या. त्या वडाळ्यातल्या आपल्या बहिणीकडे जात होती. दाडिया देवी या एका कपड्याच्या दुकानात काम करायच्या. दोन मुली आणि एक मुलगा असा त्यांचा परिवार आहे, शैलेंद्र यांनी सांगितलं आहे.

सूरत इथून त्या ट्रेनमध्ये चढल्या आणि शुक्रवारी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान या महिलेची निर्घृण हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ज्या ट्रेनमध्ये दाडिया देवींचा मृतदेह आढळून आला ती ट्रेन सूरतनंतर थेट वसई, बोरीवली आणि दादरला थांबते. याच दरम्यान, रेल्वेतून काही महिला उतरताना दिसत आहे. जर त्या महिलांनी मृतदेह पाहिला तर त्यांनी याबद्दल पोलिसांना का नाही सांगितलं?, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# उद्योग, व्यवसायांची वीज महागणार

## *वाढीव दर जानेवारीपासून, शेतकऱ्यांना सौर कृषीपंप देण्यासाठी निर्णय*

**मुंबई - शहरी भागातील उद्योग व वाणिज्यिक ग्राहकांवर एक जानेवारीपासून प्रति युनिट १० पैसे इतकी विद्युत शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शेतकऱ्यांना एक लाख सौर कृषीपंप देण्यासाठी उत्पन्नवाढीचा हा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. उद्योगांना महाग दराने वीज मिळत असल्याची तक्रार असताना पुढील वर्षी ती विद्युतशुल्कवाढीमुळे आणखी महागणार आहे. दरम्यान, राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून गेल्या दोन वर्षांची विद्युत शुल्काची वसुली करण्याच्या निर्णयावर सरकार ठाम आहे.**

शेतकऱ्यांना पुढील तीन वर्षांत एक लाख सौर कृषीपंप देण्याचा निर्णय राज्य सरकारने नुकताच घेतला असून या आर्थिक वर्षात २५ हजार, पुढील वर्षी ५० हजार व तिसऱ्या वर्षांत २५ हजार सौर कृषीपंप दिले जातील, असे उर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. त्यासाठी सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा निधी उभारण्यासाठी शहरी भागातील



उद्योग व वाणिज्यिक ग्राहकांच्या विद्युत शुल्कवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यातून वार्षिक ९०४ कोटी रुपये उत्पन्न राज्य सरकारला मिळणार असल्याचे उर्जा विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सांगितले.

या विद्युतशुल्कवाढीतून ग्रामीण भागाला आणि घरगुती व अन्य ग्राहकांना वगळण्यात आले आहे. राज्य सरकार उद्योग व वाणिज्यिक ग्राहकांकडून सध्या २४.०१ पैसे प्रति युनिट इतके विद्युत शुल्क आकारत आहे. त्यात १० पैशांची वाढ होणार आहे. मात्र अन्य राज्यांच्या तुलनेत उद्योगांना वीज महाग मिळत असल्याची त्यांची नाराजी असताना पुढील वर्षी पुन्हा सौर उर्जापंपांसाठी बोजा टाकला जाणार आहे.

दरम्यान, महावितरणने राज्यभरातील शिक्षण संस्थांकडून २०१६ पासूनचे विद्युत शुल्क वसूल करण्यास सुरुवात केल्याने संस्थाचालकांमध्ये असंतोष असला तरी या निर्णयावर राज्य सरकार ठाम आहे. विद्युत शुल्क अधिनियमात याआधी धर्मादाय संस्था किंवा सार्वजनिक विश्वस्त निधी संस्था म्हणून नोंदणी असलेल्या शिक्षण संस्थांना विद्युत शुल्क माफ करण्यात आले होते.

## अदानीच्या गुजराती वीजबिलावर...

**(पान १ वरुन)** कंपनीच्या या भाषा निवडीच्या उपक्रमामुळे मीरा-भाईंदर शहरात मोठ्याप्रमाणात गुजराती भाषेत विद्युत बीले वितरीत केली जात आहेत. शहरात मराठी भाषिक अस्तित्वात असताना आणि मराठी महाराष्ट्राची राजभाषा असतानाही या खासगी कंपनीने राजभाषा अधिनियमाचे उल्लंघन केल्याचा आरोप समितीने केला आहे. विद्युत बीलांवरील गुजराती भाषेवर तीव्र आक्षेप घेत समितीच्या मीरा-भाईंदर शहरातील शिष्टमंडळाने अदानी इलेक्ट्रीसिटी कंपनीच्या उत्तर विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची भाईंदर येथील कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी मराठी भाषेला प्राधान्य देण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. त्यावर अधिकाऱ्यांनी ७ दिवसांत वरीष्ठांशी चर्चा करुन कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन शिष्टमंडळाला दिले. शिष्टमंडळात मीरा-भाईंदर शहराध्यक्ष सचिन घरत, कार्याध्यक्ष प्रदीप सामंत, सचिव कृष्णा जाधव, पदाधिकारी प्रदीप जंगम, विभागीय अध्यक्ष अमित म्हात्रे, स्वप्निल तपासे आदींचा समावेश होता.

## मी स्पायडरमॅन आहे का? न्यायाधीशांना उर्मट उत्तर देणं पोलीस अधिकाऱ्याला पडलं महागात

**मुंबई -** अनेकदा पोलिसांकडून नागरिकांना उर्मट दिली जात असल्याचं आपण अनेकदा पाहिलं आहे. मात्र असंच उर्मट देणं एका वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला चांगलंच महागात पडलं आहे. आठमुठेपणाने उत्तर दिल्याने वरिष्ठ पोलिस निरीक्षकाला तातडीने साईट ब्रांच एसबी-२ येथे बदलीची नामुष्की पत्करावी लागली आहे. विलास गंगावणे असं पोलीस अधिकाऱ्याचं नाव आहे.



मागील आठवड्यात मरीन लाईन्स पोलिसांनी मरीन ड्राइव्ह या ठिकाणी नाकाबंदी लावली होती. या नाकाबंदीला स्वतः वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास गंगावणे जातीने उपस्थित होते. नाकाबंदी सुरु असताना दुसऱ्या बाजूला मॉर्निंग वॉक करणाऱ्यांची वर्दळ होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास गंगावणे नाकाबंदीवर लक्ष ठेवून असताना एक दुचाकी त्यांच्यासमोरुन गेली. त्या दुचाकीवर तिघेजण असतानाही विलास गंगावणे यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला नाही.

हा प्रकार मॉर्निंग वॉक करणाऱ्या एका न्यायाधीशांनी पाहिला. यावर नाकाबंदी पोलिसांची आणि खुद्द वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास गंगावणे यांची कुठलीच हालचाल न पाहिल्याने त्या न्यायाधीशांनी विलास गंगावणे यांना आपण त्या ट्रिपल सीट बाईकस्वाराला पकडा असे सांगितले. यावर विलास गंगावणे यांनी त्यांनी उर्मट शब्दात उत्तर दिले आणि तिथे त्यांची फसगत झाली.

'मी काय स्पायडरमॅन आहे काय त्यांना पकडायला', असं उत्तर देत विलास गंगावणे यांनी न्यायाधीशांचा प्रश्न धुडकावून लावला. न्यायाधीशांनी काहीही प्रतिकार न करता निघून गेले. पण रोज कायदा मोडणाऱ्यांना जाब विचारणारे न्यायाधीश यांनी दुसऱ्या दिवशी पोलीस आयुक्तांना फोन करून सांगितले. अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. यानंतर मुंबई पोलीस आयुक्तानी विलास गंगावणे यांची एसबी-२ येथे तडकाफडकी बदली केली.

## संपादकीय...

# वाहनांच्या संख्येवर निर्बंध घालण्याची वेळ आली!



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

शुक्रवारी वर्तमानपत्रांमध्ये दोन बातम्या झळकल्या. त्यापैकी पहिली बातमी ही होती, की भारतातील दर आठपैकी एका मानवी मृत्यूसाठी वायू प्रदुषण कारणीभूत असते. दुसरी बातमी ही होती, की नागपूर शहरात एका वाहतूक पोलिसामागे ३,१०६ एवढी वाहनांची संख्या आहे आणि त्यामुळे वाहतूक पोलिसांवर प्रचंड ताण येत आहे. म्हटले तर दोन्ही बातम्या वेगवेगळ्या आहेत; पण खोलात जाऊन विचार केल्यास, वाहनांची वाढती संख्या हा दोन्ही बातम्यांमधील समान दुवा आहे! भारतीय वैद्यकीय परिषदेने गुरुवारी प्रसृत केलेल्या अहवालानुसार, भारतातील वायू प्रदुषणाची पातळी विद्यमान किमान पातळीपेक्षा कमी असती तर, सरासरी आयुर्मानात किमान १.७ वर्षांनी वाढ झाली असती. वायू प्रदुषणामुळे मानवी जीवनास निर्माण झालेला धोका धुम्रपानामुळे संभवणाऱ्या धोक्यापेक्षाही मोठा असल्याचा इशाराही अहवालात देण्यात आला आहे. वायू प्रदुषणासाठी इतरही घटक कारणीभूत असले तरी, वाहनांमुळे होणारे प्रदुषण त्यामध्ये मोठी भूमिका अदा करीत आहे आणि दिवसागणिक वाहनांच्या संख्येत भरच पडत असल्याने वायू प्रदुषणामधील वाहनांद्वारा होणाऱ्या प्रदुषणाचा टक्का वाढताच आहे. भारतात १९५१ मध्ये अवघी तीन लाख वाहने होती. त्यानंतरच्या पन्नास वर्षात त्यामध्ये तब्बल ५८० लाख वाहनांची भर पडली. पुढच्या १५ वर्षात वाहनांची संख्या जवळपास चौपटीने वाढली. सरकारी आकडेवारीनुसार ३१ मार्च २०१५ रोजी देशात २१ कोटी २३ हजार २८९ वाहने होती. वाहनांच्या संख्येत रोजच भर पडत आहे आणि त्यासोबतच वायू प्रदुषणही वाढत आहे. वाहनांची संख्या ज्या गतीने वाढत आहे, त्या गतीने



रस्त्यांची लांबी आणि रुंदी न वाढल्याने रस्त्यांवर वाहनांची अतोनात गर्दी झाली आहे. कुर्मगतीने सुरू असलेली वाहतूक हे मोठ्याच नव्हे तर छोट्या शहरांमधीलही चित्र आहे. वाहने जेव्हा कमी वेगाने धावतात तेव्हा अधिक प्रदुषण निर्माण करतात. ही बाबही वायू प्रदुषणामध्ये भर घालत आहे. वायू प्रदुषणास आळा घालायचा झाल्यास वाहनांच्या संख्येस प्रतिबंध घालणे अत्यंत गरजेचे झाले आहे; मात्र कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या अभावी ते शक्य दिसत नाही. वाहनांची अतोनात वाढलेली संख्या आणि त्यामुळे वाढत असलेले वायू प्रदुषण ही समस्या विकसित देशांमधील कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक प्रणाली असलेल्या शहरांनाही भेडसावत आहे, तिथे भारतीय शहरांचा काय पाड? सिंगापूरसारख्या शहराने गतवर्षी यापुढे कारच्या संख्येत भर न पडू देण्याचा निर्णय घेतला. सिंगापूरमध्ये आधीपासून एक नियम आहे. त्यानुसार कुणालाही कार विकत घेताना सरकारकडून एक विशेष प्रमाणपत्र विकत घ्यावे लागते. त्याची किंमत ५० हजार सिंगापूर डॉलर्स एवढी प्रचंड आहे. त्याशिवाय सिंगापुरात कारवरील कर आणि आयात शुल्कही प्रचंड आहे. त्यामुळे आपसुकच कार बाळगण्याचे प्रमाण कमी झाले होते. गतवर्षीपासून तर जुनी कार भंगारात निघाल्याशिवाय नवी कार रस्त्यावर उतरूच द्यायची नाही, असा निर्णय तेथील सरकारने घेतला. ज्या देशात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अत्यंत कार्यक्षम आहे, त्या देशात असे निर्णय घेतले जात असताना भारतात मात्र वाहनांची संख्या मर्यादित करण्याचा विचारही केला जात नाही. नाही म्हणायला गत काही वर्षांपासून भारतातील मोठ्या शहरांमध्ये मेट्रो रेल्वेच्या उभारणीने वेग घेतला आहे; मात्र केवळ मेट्रो रेल्वे आल्याने लोक खासगी गाड्यांचा वापर करणे बंद करतील, अशी अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. लोकांना ज्या ठिकाणी जायचे असते, त्या प्रत्येक ठिकाणी मेट्रो रेल्वे पोहचू शकत नाही. त्यामुळे जोपर्यंत मेट्रो स्थानकापासून अंतिम गंतव्य स्थानापर्यंत पोहचण्याची व्यवस्था होणार नाही, तोपर्यंत ज्यांना स्वत:चे वाहन बाळगणे परवडते, ते स्वत:च्या वाहनाने फिरण्यालाच प्राधान्य देतील, हे स्पष्ट आहे. त्यामुळे मेट्रो रेल्वेचे जाळे निर्माण करण्यासोबतच, मेट्रो स्थानकांपासून जवळच्या गंतव्य स्थळी पोहचण्यासाठी सायकली किंवा विजेरीवर चालणारी स्वयंचलित दुचाकी वाहने उपलब्ध करून देण्याची प्रणालीही विकसित करावी लागेल. तसे झाले तरच लोक सार्वजनिक वाहतूक प्रणालीकडे वळतील. याशिवाय विजेरीवर चालणाऱ्या ई-वाहनांच्या वापरास चालना देणेही अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडीवर मार्ग निघणार नसला तरी, किमान वायू प्रदुषणास आळा बसण्यास निश्चितच मदत होईल. दुर्दैवाने आपल्या देशात त्यासंदर्भात केवळ तोंडाची वाफ दवडणेच सुरू आहे. प्रत्यक्षात काहीही होताना दिसत नाही. ई-वाहनांच्या वापरास चालना देण्याशिवाय किमान महानगरांमध्ये तरी जास्त इंजीन क्षमतेच्या डिझेल गाड्या वापरण्यावर बंदी आणणे गरजेचे झाले आहे. शिवाय वायू प्रदुषणासाठी केवळ मोठ्या वाहनांवरच दोषारोपण करून चालणार नाही, तर दुचाकी वाहने मोठ्या वाहनांपेक्षाही जास्त वायू प्रदुषण करतात ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन दुचाकी वाहनांच्या संख्येवर निर्बंध लावण्याचाही विचार करणे गरजेचे आहे.

# पुनर्विचार करण्याची वेळ



**आम्ही प्लॅस्टिकच्या युगात राहत आहोत आणि आधुनिक अर्थव्यवस्थेवर या सर्वव्यापी साहित्याचा प्रभाव जाणून घेण्याची वेळ आली आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम 2018 मध्ये नवे प्लॅस्टिक युग ही संकल्पना सादर करण्यात आली असून प्लॅस्टिकचे भवितव्य आणि त्याचा आपल्याशी असलेला संबंध याबाबत पुनर्विचार करण्याची वेळ आता जवळ आली आहे. अत्यंत शाश्वत पद्धतीने प्लॅस्टिकचा वापर करण्याबाबत सर्वांगीण विचार करणे फारच गरजेचे झाले आहे. यासाठी सरकार, उद्योगक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, धोरणकर्ते आणि सर्वसामान्य लोकांच्यात परस्पर संवाद असणे आवश्यक आहे.**

आपण जेव्हा प्लॅस्टिकबद्दल बोलतो, तेव्हा समाजमाध्यमे किंवा व्यासपीठांमधून पसरत जाणारी चुकीची माहितीच अधिक पुढे येते. प्लॅस्टिकचे आपल्या आयुष्यातले महत्त्व, प्लॅस्टिकचे विविध प्रकार आणि त्यांचा वापर, तसेच त्यांच्या रिसायकलिंगच्या पद्धती यांचा अभ्यास केल्यानंतरच नव्या प्लॅस्टिक अर्थव्यवस्थेची संकल्पना स्पष्ट होऊ शकेल.

पिशव्या बनवण्यासाठी वापरले जाणारे प्लॅस्टिक हे पाण्याच्या बाटल्यांसाठी किंवा शाम्पूच्या बाटल्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकपेक्षा वेगळे असते. प्रत्येक प्रकारच्या प्लॅस्टिकला १ ते ७ असे दर्जात्मक क्रमांक असतात, ते रिसायकल ट्रँगलवर लिहिलेले असतात. विविध प्रकारच्या प्लॅस्टिक्समध्ये पेट (पॉलीइथिलीन टेरीफ्लेट) आणि एचडीपीई (हाय डेन्सिटी पॉलीइथिलीन) हे प्लॅस्टिकचे प्रकार सुरक्षित मानले जातात. त्यांच्यातील रसायने पसरत नसून अन्नाच्या पॅकेजिंगसाठी ती वापरता येतात. सर्व प्लॅस्टिकमध्ये भिन्न रासायनिक संरचना आहेत. एखाद्या विशिष्ट प्लॅस्टिकच्या चुकीच्या वापरामुळे दीर्घकाळापर्यंत पर्यावरणीय व आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

प्लॅस्टिक हे निरंतर विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम असून रिसायकलिंगची त्यात क्षमता आहे. प्लॅस्टिकच्या वास्तविक पर्यावरणीय कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी आपण जीवनचक्र विश्लेषण (एलसीए) दृष्टिकोन वापरला पाहिजे. एलसीए दृष्टिकोन उत्पादनाच्या संपूर्ण पर्यावरणीय परिणामाचे मूल्यांकन करतो. ज्याला क्रॅडल-टू-क्रॅडल विश्लेषण म्हणतात. उत्पादन स्तरावरील कच्च्या मालाची पत आणि उत्पादनांचा वापर केल्यानंतर त्याची विल्हेवाट वा रिसायकलिंगवर उत्पादनाच्या परिणामांचे मूल्यांकन केले जाते. या सर्व घटकांचे मिश्रण मूळ वास्तवाची एक समग्र प्रतिमा देते. तुलनात्मक एलसीए स्पष्टपणे सूचित करतो की, प्लॅस्टिक आर्थिकदृष्ट्या परवडणारे, सामाजिकरीत्या स्वीकारार्ह आणि पर्यावरणीयदृष्ट्या प्रभावी आहे.

आपल्या जीवनात प्लॅस्टिकची अपरिहार्यता ही निश्चित बाब आहे. भविष्यात प्लॅस्टिकचा व्यवहार्य पर्याय असू शकणारी नवीन सामग्री शोधण्यासाठी अनेक वर्षे लागतील. तोपर्यंत आपल्याला प्लॅस्टिकचा सुसंगत वापर करणे अत्यावश्यक आहे. नवी प्लॅस्टिक्स अर्थव्यवस्था ही संकल्पना रेषीय क्षेत्राच्या आर्थिक मॉडेलमध्ये रूपांतरित करण्याच्या फायद्यांचे मूल्यांकन करते आणि या शिफ्टची अंमलबजावणी करण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोन बाळगते.

जागतिक स्तरावर वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकच्या एकूण खंडापैकी २६ टक्के प्लॅस्टिक पॅकिंगसाठी वापरले जाते. १५ वर्षांच्या आत या दरात दुप्पट वाढ होण्याची अपेक्षा आहे आणि २०५० पर्यंत हे प्रमाण चौपट वाढून ते ३१८ दशलक्ष टन होण्याची शक्यता आहे. हा आकडा आज संपूर्ण प्लॅस्टिक उद्योगापेक्षाही अधिक आहे. तथापि, पहिल्या वापरानंतर ९५ टक्के प्लॅस्टिक पॅकेजिंग अर्थव्यवस्थेतून गायब होते. न्यू प्लॅस्टिक्स इकॉनॉमीची दृष्टी अशी आहे की, प्लॅस्टिक कधीही कचरा बनत नाही; त्याऐवजी ते अर्थव्यवस्थेला मौल्यवान तांत्रिक किंवा जैविक पोषकतत्त्वे म्हणून पुन्हा प्रविष्ट करता येते. उद्योगोत्तर वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक अर्थव्यवस्थेची निर्मिती करणे हे अर्थव्यवस्थेचे मूळ ध्येय असून यामुळे पर्यावरणावरही चांगला परिणाम साधता येतो.

भारतीय परिसंस्थेचा विचार करता पुनर्वापर आणि रिसायकलिंगचे प्रमाण वाढवणे; यामुळे केवळ पर्यावरणाला फायदा होणार नाही, परंतु त्याहून मोठे फायदे होतील. प्लॅस्टिक पॅकेजिंग मार्केटमध्ये व्यावसायिक फिल्म्स तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकचे तसेच, पीईटी-आधारित पाणी/पेय बाटल्यांच्या रिसायकलिंगमधून मोठ्या किमतीचा लाभ होतो. नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एनसीएल) च्या अभ्यासानुसार, दरवर्षी ९०० किलो टन पीईटीचे भारतातून ९५ टक्के उत्पादन होते. नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आणि कचरा व्यवस्थापनास प्रोत्साहन देऊन या टक्केवारीस प्रोत्साहन दिले जाऊ शकते आणि याचा इतर प्लॅस्टिकच्या बाबतीतही विस्तार केला जाऊ शकतो.

नैसर्गिक परिसंस्थांमध्ये प्लॅस्टिकची गळती कमी करण्याचा एकमात्र मार्ग म्हणजे मजबूत संग्रह आणि पुनर्प्राप्ती संरचना. भारतासारख्या विकसनशील देशांसाठी हे विशेषकरून महत्त्वपूर्ण आहे, जेथे उत्पादन व वापरामुळे प्लॅस्टिकची पुनर्प्राप्ती वेगाने जुळून येत नाही. यासाठी विस्तारित उत्पादक जबाबदारीच्या कठोर अवलंबनाची आवश्यकता आहे. या अंतर्गत उत्पादकांना उप-ग्राहक मिळतील व उत्पादनांच्या उपचारासाठी किंवा आर्थिक वापरासाठी आर्थिक किंवा भौतिक जबाबदारी त्यांच्यावर देता येईल. सरकारी यंत्रणेला यासाठी प्रमुख भूमिका घेणे अत्यावश्यक असून उत्पादकांद्वारे प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियम (२०१६) मध्ये सूचीबद्ध केलेल्या पॉइंट्सच्या अंमलबजावणी धोरणाची आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्रोत पृथक्करण. यात कचरा वेचणारी व्यक्ती, रिसायकलर्स आणि कचरा प्रोसेसर या संपूर्ण सिस्टीमचा अविभाज्य वाटा असतो. यामुळे प्रदूषणकारी घटकच नुकसानीत जातो, हे तत्त्व सिद्ध होते. प्लॅस्टिकसाठीचे मानवी आचरण हे या दृष्टिकोनांच्या सोल्यूशन्सच्या मुळांवर आहे. जागरूकता आणि ज्ञान यातून एक उद्दिष्ट तयार होईल, जे कार्यक्षम कचरा व्यवस्थापन व्यवस्थेसह समर्थित असेल. असे झाल्यासच आपल्या देशासाठी उल्लेखनीय आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे मिळण्याची शक्यता आहे.

# तस्करांना दुहेरी दंडाचा हिसका

## गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवरही दंड

**पालघर** – पालघर तालुक्यात गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात महसूल विभागाने मोहीम हाती घेतली असून या कारवाईत पकडलेल्या अवैध गौण खनिजावर दंडात्मक कारवाई करण्यासोबत त्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईस महसूल विभागाने आरंभ केला आहे.



पालघर जिल्ह्यात रेती, वाळू, दगड, मुरुम, खडी तसेच दगडाची भुकटी या गौण खनिज प्रकाराचे गैरमार्गाने तसेच रॉयल्टी न भरता वाहतूक सुरू असते. गैरमार्गाने होणाऱ्या रेती उत्खनन तसेच गौण खनिजाच्या वाहतुकीच्या विरुद्ध पालघरचे उपविभागीय अधिकारी विकास गजरे, पालघरचे तहसीलदार महेश सागर यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून दंडात्मक कारवाईला आरंभ केला आहे.

पालघर जवळील बहाडोली येथे असलेल्या अवैध रेती बंदरावर महसूल विभागाने छापा टाकून किमान पाच फायबर बोट आणि बंदरावरील अवैध रेतीचा साठा ताब्यात घेतला आहे. बंदरावर सापडलेल्या फायबर बोटींवर कारवाई करण्याची कृती महसूल विभाग करत असून बोटींवर असलेले उपसा पंप, रेती चाळण्याची समद्री जप्त करण्यात आली आहे. यासह पालघरच्या महसूल विभागाने रेतीसह इतर गौण खनिज वाहतूक करणाऱ्या १२ ट्रकवर कारवाई केली असून त्यांच्याकडून दहा लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

### अवैध वाहतुकीला लगाम

महसूल विभागाने गौण खनिज उत्खनन व वाहतूक संदर्भातील नवीन दरपत्रकाची अंमलबजावणी सुरू केली असून चारशे ब्रास रेतीला ९९ हजार ५९० रुपये, चारशे ब्रास दगडाला १४ हजार ९०० रुपये, मुरुमला सुमारे ११ हजार रुपये तर दगडाच्या भुकटीला १७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येत आहे. या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर यापुढे दंडात्मक कारवाई होणार असून ड्रील मशीन ला २५ हजार, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली, हाफ बॉडी ट्रक आणि उपसा पंप याना एक लाख रुपये, पूर्ण ट्रक, डम्पर आणि कॉम्प्रेसर यांना प्रत्येकी दोन लाख रुपये तर ट्रॉलर, बार्ज मोटर राईट बोट यांना पाच लाख रुपयाची दंडआकारणी होणार असल्याची माहिती पालघरचे उपविभागीय अधिकारी विकास गजरे यांनी दिली. या दुहेरी दंडात्मक पद्धतीमुळे गौण खनिजाच्या गैरमार्गाने आणि विनापरवाना वाहतुकीवर नियंत्रण येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

# सिडकोच्या विद्युत विभागातील शेकडो कोटींच्या गैरव्यवहारांची होणार चौकशी

**ठाणे :** सिडकोच्या विद्युत विभागाने गेल्या दहा वर्षांत केलेली कामे चौकशीच्या फेऱ्यात सापडली आहेत. नवी मुंबई विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात सिडकोने अलीकडेच काढलेल्या २५० कोटींच्या कामांत गैरव्यवहार झाला असून काही विशिष्ट ठेकेदारांना लाभ व्हावा म्हणून त्यांच्या फायद्याच्या अटी व शर्ती निविदेत टाकल्याच्या तक्रारी काही खासदारांनी पंतप्रधान कार्यालयाकडे केल्या होत्या. त्यांची दखल घेऊन पीएमओने राज्याच्या ऊर्जामंत्र्यांना चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्रयस्थ समितीकडून एका महिन्याच्या आत ही निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

विमानतळ क्षेत्रात अलीकडे काढलेली सुमारे २५० कोटींची कामेच नव्हे तर गेल्या दहा वर्षांत सिडकोच्या विद्युत विभागाने केलेल्या सर्व कामांची चौकशी लावली आहे. यामुळे सिडकोतील शेकडो कोटींचा गैरव्यवहार उघडकीस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



सिडकोच्या विद्युत विभागात २००८ पासून सुरू असलेल्या अनागोंदीची तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी तत्कालीन दक्षता अधिकारी प्रज्ञा सरवदे यांना चौकशी करायला सांगितले होते. सरवदे यांनी प्राप्त झालेल्या चार प्रकरणांची चौकशी करून सिडकोचे अधीक्षक अभियंता विद्युत, कार्यकारी अभियंता विद्युत १ व २ यांच्यावर गुन्हा दाखल करून खातेनिहाय चौकशी करण्याची शिफारस सिडकोचे व्यवस्थापकीय संचालकंना २०१५-१६ मध्ये केली होती. मात्र, ही कारवाई आजपर्यंत झालेली नाही. अशातच विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात सुरू असलेल्या २५० कोटींच्या कामांच्या अनागोंदीबाबत पंतप्रधान कार्यालयाकडेच खासदार प्रतापराव जाधव आणि कृपाल तुमाने यांच्यासह इतरांकडून तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यानुसार आता थेट पंतप्रधान कार्यालयानेच सिडकोच्या विद्युत विभागातील अनागोंदीची दखल घेतल्याने संबधित अधिकाऱ्यांची धाबे दणाणले आहे.

# १८ वर्षांनंतर फरार कैदी सापडला



**ठाणे** - पॅरोल मिळाल्यानंतर फरार झालेला जन्मठेपेतील एक कैदी तब्बल १८ वर्षांनंतर सापडला असून या कैद्याला ठाणे गुन्हे शाखा युनिट एकने उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. यावेळी आरोपीला ताब्यात घेताना स्थानिक नागरिकांनी जोरदार विरोध केला होता. मात्र गुन्हे शाखेच्या पथकाने या विरोधाला न जुमानता आरोपीला अटक केली.

अशोककुमार उपेंद्रसिंग असे या आरोपीचे नाव असून तो मूळचा सुलतानपूरचा राहणारा आहे. स्थावर मालमत्तेच्या वादातून करवालोनगर येथील रामनारायण खरबानी सिंग याची ५ डिसेंबर १९९४ रोजी अशोककुमार आणि त्याचे साथीदार प्रयागसिंग भारतीसिंग, वेदप्रकाश वीरेंद्रकुमार सिंग यांनी धारदार शस्त्राने वार करून हत्या केली होती. याप्रकरणी वर्तकनगर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या हत्येप्रकरणी आरोपींनी ठाणे सत्र न्यायालयाने १९९७ मध्ये जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. अशोककुमार हा नाशिक मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. मात्र पॅरोल रजा मिळाल्याने तो कारागृहातून बाहेर पडला होता. मात्र नंतर तो कारागृहात परतलाच नव्हता. गुरुवारी उत्तर प्रदेशच्या स्पेशल टास्क फोर्स आणि स्थानिक पोलिसांची मदत घेत अशोककुमार याला त्याच्या गावातून ताब्यात घेतले.

# ठाण्यात ८८२ मालमत्ता जप्त, १५९ मालमत्ता सील

## थकबाकीदारांविरोधात महापालिकेची कारवाई

**ठाणे** - ठाणे महापालिका क्षेत्रातील मालमत्ता कर आणि पाणी बिल थकबाकीदारांविरोधात प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून त्यामध्ये आतापर्यंत ८८२ मालमत्तांवर जप्तीची तर १५९ मालमत्तांना टाळे ठोकण्याची कारवाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर ९८ नळ जोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. ठाणे महापालिकेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात मालमत्ता कर वसुलीतून ६०० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. त्यापैकी ३२५ कोटी रुपयांची आतापर्यंत वसुली झाली आहे. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या कामात अधिकारी-कर्मचारी व्यस्त होणार असल्याची बाब लक्षात



घेऊन प्रशासनाने डिसेंबर अखेपर्यंत उर्वरित कराची वसुली करण्यावर भर देण्यास सुरूवात केली आहे. त्याचबरोबर मालमत्ता कर आणि पाणी बिल थकबाकीदारांची यादी तयार करून त्यांच्यावर जप्तीची कारवाई करण्याचे आदेश आयुक्त संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत. या आदेशानंतर संबंधित विभागाने शहरातील एकूण १७६ विभागातील आठ हजार ८०० बड्या थकबाकीदारांची यादी तयार करून त्यांच्याविरोधात कारवाई सुरू केली आहे. या यादीमधील थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करणे किंवा त्यांच्या मालमत्तेला टाळे लावणे अशा स्वरुपाची कारवाई केली जात आहेत. या कारवाईत आतापर्यंत ८८२ मालमत्तांवर जप्तीची तर १५९ मालमत्तांना टाळे ठोकण्याची कारवाई करण्यात आली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील गृहसंकुले आणि उद्योग संकुलांमध्ये मालमत्ता कराची सदनिका किंवा युनीटनिहाय स्वतंत्र बिले दिली जात असतील तर त्याठिकाणी मालमत्ता कर वसुलीसाठी शिबीर घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. गृहसंकुल किंवा उद्योग संकुलाच्या विनंतीनुसार हे शिबीर आयोजित करण्यात येईल, अशी माहिती महापालिकेकडून देण्यात आली. तसेच या शिबीरासाठी प्रभाग समितीमधील मालमत्ता कर विभागाकडे संपर्क साधण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.

# वायुगळतीने तालुक्यातील नागरिकांना श्वसनाचा त्रास

**उरण :** उरण तालुक्यातील जासई ग्रामपंचायत हद्दीतील आणि चिर्ले गावाजवळ वसलेल्या वैष्णो लॉजिस्टिक यार्डमध्ये लागलेल्या आगीमुळे हवेत पसरणाऱ्या घातक केमिकल्सच्या उग्र वासामुळे आता येथील रहिवाशांना श्वसनाचा त्रास जाणवू लागला आहे. सदर यार्डमधील घातक केमिकल्स नाल्याद्वारे खाडी परिसरात पसरल्याने खाडीतील मासे मृत्युमुखी पडले आहेत. इतकी गंभीर घटना घडल्यानंतरही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कोणावरही कारवाईचा बडगा उगारला नसल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे.



यार्डच्या दुर्घटनेला शासनाचे अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप भयभीत झालेल्या नागरिकांकडून करण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी राहुल मोटे यांना या घटनेसंदर्भात विचारणा केली असता त्यांनी माहिती देताना सांगितले की, वैष्णो लॉजिस्टिक यार्डमध्ये लागलेल्या आगीसंदर्भात आमची कारवाई सुरू आहे.

# उघड्यावर मांसविक्री महागात पडणार

**नवी मुंबई** - विनापरवाना उघड्यावर प्राण्यांची कत्तल करून मांसविक्री करणाऱ्या विक्रेत्यावर नवी मुंबई पालिका फौजदारी गुन्हे दाखल करणार आहे. मागील दोन दिवसांत तीन विक्रेत्यांवर कारवाई करीत पालिकेच्या पथकाने २०० कोंबड्या व तीन बकऱ्यांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई तीव्र केली जाणार आहे.

नवी मुंबई पालिकेचा स्वत:चा कत्तलखाना नाही. त्यामुळे मुंबईतील देवणार कत्तलखान्यातून कत्तल केलेले मांस या ठिकाणी आणून त्याची विक्री करावी असे अभिप्रेत आहे. या विक्रीसाठीही पालिकेचा परवाना घेणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे मुंबईत कत्तल केलेले मांस या ठिकाणी आणून विकण्यास पालिकेने परवानगी दिली आहे. असे असताना नवी मुंबईतील अनेक मांस विक्रेते उघड्यावर प्राण्यांची कत्तल करीत असून त्याच ठिकाणी त्यांची विक्री करीत असल्याचे सर्रास दिसून येते.

# राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढणार!

## राज्यातील विविध भागांतील दौऱ्यानंतर केंद्रीय पथकाचा इशारा

**मुंबई – राज्यातील दुष्काळाची तीव्रता येत्या काळात अधिक वाढणार असून चारा व पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता असल्याचा इशारा केंद्राच्या पाहणी पथकाने शुक्रवारी राज्य सरकारला दिला. त्यावेळी दुष्काळाची गंभीर स्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने पाठविलेल्या सात हजार ९६२ कोटी रुपयांच्या प्रस्तावाचा स्वीकार करून राज्याला जास्तीत जास्त निधी मिळावा, अशी मागणी मदत व पुनर्वसनमंत्री चंद्रकांत पाटील यांनी या पथकाकडे केली.**

दुष्काळ स्थिती गंभीर असल्यामुळे मदत देण्यासाठी पाहणी अहवाल लवकरात लवकर सादर करण्याची ग्वाही पथकाच्या प्रमुख सहसचिव श्रीमती झा यांनी या वेळी दिली. राज्यातील दुष्काळी स्थितीची पाहणी करण्यासाठी



केंद्र शासनाने पाठविलेल्या तीन पथकांनी गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील विविध भागांतील दौरे केले. त्यानंतर शुक्रवारी सह्याद्री अतिथिगृहात या पथकांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

महसूल, कृषी आणि मदत व पुनर्वसनमंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री दिलीप कांबळे, कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव मेधा गाडगीळ, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव शामलाल गोयल, दुग्धविकास, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, वित्त विभागाचे प्रधान सचिव राजीव मित्तल, कृषी आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह आदी या वेळी उपस्थित होते. केंद्रीय पथकामध्ये केंद्रीय कृषी विभागाच्या सहसचिव छवी झा, ए. के. तिवारी, विजय ठाकरे, मानश चौधरी, एस. सी. शर्मा आदींचा समावेश होता. राज्यातील टंचाई स्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्यातील सर्व मंत्र्यांना प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर केंद्र शासनाच्या निकषानुसार १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करून उपाय योजना सुरू केल्या आहेत. त्याचप्रमाणे आणखी २६८ मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर करून राज्य शासनाच्या मदतीतून तेथे उपाय योजना सुरू करण्यात आल्या आहेत. अद्यापही काही ठिकाणी दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असून त्याची तपासणी करून येत्या दोन ते तीन दिवसांत त्याबद्दल निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती पाटील यांनी बैठकीनंतर दिली. राज्यातील दुष्काळाची स्थिती बिकट असून जास्तीत जास्त निधी मिळावा, अशी मागणी पथकाकडे केली असून त्यांनीही अधिकाधिक मदत मिळवून देण्यासाठी सहमती दर्शविली आहे, असेही पाटील यांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या पथकानेही या वेळी दौऱ्यातील निरिक्षणे मांडताना राज्यात अनेक ठिकाणी दुष्काळ असून जनतेकडून चारा छावण्या व टँकरची मागणी होत असल्याचे सांगितले. राज्यातील अनेक भागात येत्या काळात आणखी मोठ्या प्रमाणात चारा व पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण पथकातील सदस्यांनी या वेळी नोंदविले.

# वर्दीवर उचलला भाजप पदाधिकाऱ्यांनी हात

## अटक करणाऱ्या पोलिसाची बदली

***भुसावळ - 'पार्टी विथ डिफरन्स' म्हटल्या जाणाऱ्या भाजप पदाधिकाऱ्यांनी वाहन अडवल्याच्या कारणावरून पोलिसांशी हुज्जत घालत थेट पोलीस निरीक्षकांच्या वर्दीवरच हात घातला. त्यानंतर वर्दीत असलेल्या पोलिसांनीही या पदाधिकाऱ्याला चांगल्याच खाक्या दाखवत कायद्यापेक्षा मोठे कुणी नसल्याचा प्रत्यय दिला आणि अटक केली. पण, भाजपच्या पदाधिकाऱ्याला अटक करणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे.***

चोपडा शहरातील शिवाजी चौकात भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र पाटील यांची कार तपासणीसाठी आणि सीटबेल्ट न लावण्याच्या कारणावरून वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी कार थांबवण्यासाठी सुचना केली पण त्यांनी वाहन न थांबवल्यानं पोलिसांनी वाहनाचा पाठलाग करून ते बाजार समितीजवळील मुख्य प्रवेशद्वाराजवळ त्यांची कार अडवली. कार अडवली म्हणून वाहतूक पोलीस कॉन्स्टेबल विजय निकम आणि भाजप शहराध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्यात पंचायत समितीसमोर वाद सुरू झाली. त्याचवेळी नरेंद्र पाटील यांनी भाजपचे माजी शहराध्यक्ष अनिल उर्फ राजू चिरंजीलाल शर्मा यांना फोन लावून बोलावलं तर निकम यांनीही निरीक्षक किसन नजन पाटील यांना फोन करून घटना सांगताच तेही घटनास्थळी आले.



यावेळी नरेंद्र पाटील, अनिल शर्मा आणि किसन नजन पाटील या दोघांमध्ये भांडण झालं त्यात अनिल शर्मा यांनी नजन पाटील यांची कॉलर पकडताच पोलिसांनी या दोघा आजी-माजी शहराध्यक्षांना चोप दिला. यात पोलीस निरीक्षकांच्या हाताला जखम झाली.

शहरात घटनेची वार्ता कळताच पोलीस ठाण्याभोवती गर्दी जमल्यानं एसआरपी प्लाटूनची एक तुकडी बोलावून शहर पोलीस ठाण्यातील गर्दी पांगवण्यात आली. पोलीस ठाण्यात भाजपचे आमदार हरिभाऊ जावळे, माजी आमदार कैलास पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष उदय वाघ आणि स्थानिक भाजप कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

दरम्यान, कॉन्स्टेबल विजय निकम यांच्या फिर्यादीवरून भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र साहेबराव पाटील, भाजपचे माजी शहराध्यक्ष अनिल शर्मा आणि भाजपचे कार्यकर्ते मनीष पारीख यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'रस्त्यांची कामे नीट न झाल्यास तुमच्यावर बुलडोजर चालवेन', गडकरींचा कंत्राटदारांना इशारा

**मुंबई - केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी रस्त्याची निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना कठोर शब्दात इशारा दिला आहे. आमच्या काळात हाती घेतलेल्या रस्त्यांच्या कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे सांगतानाच रस्त्यांची परिस्थिती वाईट असेल तर कंत्राटदारांवर मी बुलडोजर चालवेल असं गडकरी म्हणाले.**

प्रसिद्ध लेखक तुहिन सिन्हा यांच्या 'इंडिया इन्सपायर्स' या पुस्तकाच्या प्रकाशान सोहळ्याच्या कार्यक्रमात गडकरी बोलत होते. नितीन गडकरी यांनी वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये घेतलेल्या पुढाकारासंदर्भात हे पुस्तक आहे. या पुस्तक प्रकाशाचा कार्यक्रम काल मुंबईत पार पडला. यावेळी बोलताना त्यांनी वाहतूक मंत्रालयाच्या कामाची माहिती दिली. आम्ही आतापर्यंत कमीत कमी १० लाख कोटींच्या कामांच्या निविदा दिल्या आहेत आणि हे सांगताना मला गर्व वाटतो की, आतापर्यंत कामाची ऑर्डर घेण्यासाठी एकाही कंत्राटदाराला दिल्लीतील कार्यालयात येण्याची गरज पडली नाही. ही गोष्ट मी अभिमानाने सांगू शकतो असंही गडकरी यांनी यावेळी सांगितलं. तसेच प्रत्येक कंत्राटदाराला खडसावून सांगण्यात आलं आहे की, जर रस्त्याची कामं नीट झाली नाही. तर तोच बुलडोजर तुमच्यावर फिरवला जाईल आणि हे असं बोलण्यात मला काहीच संकोच



वाटत नसल्याचेही गडकरी यावेळी म्हणाले. रस्ते ही राष्ट्रीय संप्पती आहे आणि त्यामुळेच त्यांच्या दर्जाशी कोणतीही तडजोड करता कामा नये अशी आपली भूमिका असल्याचे गडकरींनी स्पष्ट केले.

## नवी मुंबई विमानतळावर जलमार्गाने पोहचता येणार

नवी मुंबई विमानतळाला जलमार्गाने जोडण्याची योजना असल्याचेही गडकरींनी यावेळी बोलताना सांगितले. भविष्यात नवी मुंबई येथे साकारले जाणारे आंतरराष्ट्रीय विमानतळ हे रस्त्यांबरोबरच जलमार्गानेही जोडण्याची योजना आहे. जलमार्गाने अवघ्या २० मिनिटांमध्ये विमानतळावर पोहचता येईल. मात्र या योजनेबद्दल काही पर्यावरणतज्ज्ञांनी आक्षेप नोंदवत याविरोधात कोर्टात याचिका दाखल केल्याची माहिती गडकरींनी दिली. मात्र याआधी आपण मुंबईमध्ये असताना मंत्री होतो तेव्हा अशाच प्रकारे अनेक प्रकल्पांना विरोध करण्यात आला होता अशी आठवणही गडकरी यांनी करुन दिली. मुंबईत मंत्री असताना अनेक प्रकल्पांविरोधात कोर्टात १०० हून अधिक याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यामुळेच मी कोणत्याही परिस्थित पर्यावरणाशी तडजोड करणार नाही असंही गडकरी म्हणाले. नवी मुंबई विमानतळ जलमार्गाने जोडण्याच्या प्रकल्पातून पर्यावरणाला कोणतीही हानी होणार नाही यासाठी आमच्याकडून सर्वोत्तम उपाययोजना करण्यात येणार आहेत.

# श्रीमंत महाराष्ट्राची उद्योगयात्रा वसई विरार मध्ये संपन्न

**मुंबई** - 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि अग्रीकल्चर' अध्यक्ष संतोष मंडलेचा आयोजित 'श्रीमंत महाराष्ट्राची उद्योगयात्रा' हा कार्यक्रम १ डिसेंम्बर २०१८ रोजी, रिजेन्सी बॅनक्वेट वसई येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात डॉ राधाकृष्णा पिल्लई यांनी १००हुन अधिक उद्योजकांना व्यावसायिक मार्गदर्शन दिले. श्री किरण भोईर, अशोक एडके पाटील, रोहित सोलकर, अमित बागवे यांच्या मोलाच्या सहकार्याने कार्यक्रम उत्कृष्ठ प्रतीने राबविला गेला.

या कार्यक्रमात उद्योजकांना अर्थिक भांडवल उभे करणे, ब्रँडिंग, मार्केटिंग, आपला ग्राहक ओळखणे, आपली सेवा व माल योग्य ग्राहक मिळवून देणे अशा सर्व विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

अशा प्रकारचे व्यावसायिक मार्गदर्शन शिबिर वा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात करण्याचे योजिले आहे असे वक्तव्य 'राहुल मळगांवकर', अध्यक्ष -तरुण उद्योजक कमिटी यांनी केले.

# पाच राज्यांच्या निवडणुका संपल्याने पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ होणार?

**नवी दिल्ली :** पाच राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका संपल्यामुळे केंद्र सरकार पुन्हा पेट्रोल व डिझेलच्या दरात वाढ करण्याच्या तयारीत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरांत एका लीटरमागे दोन ते अडीच रुपये वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ही दरवाढ सोमवार ते बुधवार या काळात जाहीर केली जाईल, असे समजते.

केंद्राने निवडणुकांआधी पेट्रोल व डिझेलवरील अबकारी कर कमी केला होता. त्यामुळे इंधन अडीच रुपयांनी स्वस्त झाले. तसे करण्यामागे दरवाढीमुळे लोकांमध्ये असलेली संतापाची भावनाही कारणीभूत होती. केंद्रापाठापोठ राज्य सरकारनेही इंधनांवरील कर कमी केला. तेव्हाच



आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भावही कमी झाले आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाही बऱ्यापैकी सुधारला. त्यामुळे गेल्या तीन महिन्यांत पेट्रोल व डिझेलचे दर खूप खाली आले. आताही तेलाचे भाव आंतरराष्ट्रीय बाजारात तुलनेने कमीच आहेत, पण इंधनाचे कमी होताच, सरकारचा महसूलही कमी होतो.

गेले तीन महिने दर कमी झाले आणि त्या आधी केंद्राने करकपातही केली. त्यामुळे महसुलात मोठीच घट झाली. ही घट भरून काढण्यासाठी केंद्र सरकार पुन्हा अबकारी करात वाढ करण्याच्या तयारीत असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

पेट्रोलवर आता एका लीटरला १८ रुपये ४८ पैसे, तर डिझेलवर लीटरमागे १४ रुपये ३३ पैसे अबकारी कर आकारला जातो. राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगड ही राज्ये भाजपाच्या हातातून गेली आणि त्यानंतर करवाढ केली, तर सरकारविषयी आणखी रागाची भावना लोकांत निर्माण होईल.

त्यामुळे निकालांआधीच ही वाढ करावी, असा विचार सुरू आहे. लोकसभा निवडणुकांआधी म्हणजे फेब्रुवारीपासून पुन्हा या इंधनाचे दर कमी केले जातील, अशी शक्यता आहे.

# परभणीत पोलिस भरतीसाठी मागदर्शन

**परभणी** - युवकांसाठी पोलिस भरतीचे योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून शिवसेना युवा सेनेच्यावतीने परभणी येथे प्रथम मोफत पोलिस भरती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आमदार डॉ. राहुल पाटील यांनी दिली.



परभणी जिल्ह्यातील शिबिर १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. युवकांचा पोलिस भरतीतील टक्केवारी वाढावी या हेतूने मार्गदर्शन शिबिरात पुढील भरतीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, इच्छुकांची निश्चीत भरती होण्यासाठी अचुक जिल्ह्याची निवड कशी करावी, पोलिस भरतीसाठी शासनाचे अध्यादेश, मैदानी चाचणी, लेखी परिक्षा आदी प्रत्येक घटकांचा बारकावा या बद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सह्याद्री अकादमी बारामती पुणे येथील प्रशिक्षक उमेश रूपनवर हे करणार आहेत. पोलिस भरतीच्या प्रक्रियेला सामोरे जातांना हमखास यशस्वी कसे व्हायचे हा कानमंत्र उपस्थित युवकांसाठी मार्गदर्शी ठरणार आहे. पोलिस भरतीचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या इच्छूक उमेदवारांनी या शिबिराचा आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक आमदार पाटील यांनी केले आहे.

# डाळी गाठणार शंभरी?

**पुणे - महाराष्ट्रासह परराज्यात पावसाचे घटलेले प्रमाण, खरिपाची देशभरात ५० टक्क्यांपेक्षा कमी झालेली पेरणी, डाळींच्या आयातीवरील बंदी, त्यामुळे जानेवारीअखेरीस होणारी कमी प्रमाणातील आवक यामुळे नव्या वर्षात तूरडाळ, हरभरा डाळीसह उडीद डाळींचे दर शंभर रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.**

यंदाच्या वर्षी जून ते सप्टेंबर दरम्यान देशभरात झालेला पाऊस गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहे. बहुतांश भागात पावसाने पाठ फिरविली. त्यामुळे उत्पादन भागासह राज्यांमध्ये पावसाच्या कमी प्रमाणामुळे डाळींचे उत्पादन यंदाच्या वर्षी घटण्याची चिन्हे दोन महिन्यांपासून दिसून आली. डाळ मिल उत्पादकांसह व्यापाऱ्यांना याची कल्पना असल्याने डाळींचे दर वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. डाळींची उपलब्धता आणि भवितव्य पाहता तीन वर्षांपूर्वी डाळींची टंचाई होऊन त्या वेळी झालेली परिस्थिती पुन्हा उद्भवण्याची भीतीही व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

'सर्व प्रकारच्या डाळींच्या उत्पादनावर यंदा पावसाचे संकट कोसळले आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांत सर्व प्रकारच्या डाळींचे उत्पादन होत असते. यंदाच्या वर्षी गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी पाऊस झाला. त्यामुळे डाळींच्या उत्पादनावर परिणाम होऊन ५० टक्के उत्पादन घटणार आहे. येत्या वर्षात जानेवारी फेब्रुवारीनंतर डाळींची आवक होणार आहे. जून-जुलै महिन्यात डाळींची पेरणी होते. जानेवारी-फेब्रुवारीत डाळींची आवक होते. कमी पेरणीमुळे आवक कमी होऊ शकते. परिणामी, मात्र हमीभाव, डाळींचा तुटवडा यामुळे सर्व प्रकारच्या डाळी शंभरी गाठतील,' अशी शक्यता डाळींचे व्यापारी नितीन नहार यांनी व्यक्त केली. सध्या डाळींना मागणी फारशी नाही. मार्केट यार्डातील व्यापारी वर्ग मध्य प्रदेश, राजस्थान येथील निवडणुकांसाठी गेला आहे. निवडणुका झाल्या असल्या, तरी पुढील आठवड्यात ते आल्यानंतर मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होईल. त्यामुळे मागणी वाढू शकते,



याकडे त्यांनी लक्ष वेधले.

'या वर्षी डाळींचे उत्पादन कमी आहे. पुढील वर्षात डाळींच्या कमी उत्पादनामुळे तुटवडा होणार आहेत; पण सरकार तसेच मिलचालकांकडे डाळींचा साठा अधिक आहे. परंतु, विक्री पुरेशी होत नाही. डिसेंबरनंतर तूरडाळ, हरभरा डाळीची नवीन आवक सुरू होऊ शकेल. सरकारकडे उपलब्ध तूर चांगली असल्याने त्याची तूरडाळ चांगल्या पद्धतीने होते की नाही, हे आताच सांगता येत नाही.

# भारतात पुन्हा आर्थिक मंदी येण्याची चिन्हे

**दिल्ली** – देशातील आर्थिक हालचाली पाहता येत्या काळात पुन्हा एकदा भारतात आर्थिक मंदी येण्याची चिन्हं आहेत अशी भीती माजी आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रह्मण्यम यांनी व्यक्त केली आहे. नोटाबंदी आणि जीएसटीनंतर भारतात आर्थिक मंदी आली होती. या मंदीची लाट आता ओसरली असली तरी पुन्हा एकदा आर्थिक मंदी येऊ शकते अशी भीती सुब्रह्मण्यम यांनी व्यक्त केली आहे. कृषी क्षेत्रातील तूट गेल्या दोन वर्षात भरून निघालेली नाही. तसंच जीएसटीसमोर ठेवलेलं लक्ष्यही पूर्ण करता आलेलं नाही. वित्तीय



क्षेत्रातील अनेक कंपन्या तोट्यात जात आहेत. ही परिस्थिती देशाच्या आर्थिक वृद्धीसाठी अनुकूल नसून मंदीकडे नेणारी आहेत असं मत अरविंद सुब्रह्मण्यम यांनी व्यक्त केलं आहे.

आरबीआयच्या प्रकरणाबद्दल विचारलं असता आरबीआयची स्वायत्तता कमी करावी असं मत त्यांनी व्यक्त केलं आहे. आरबीआयच्या एकाधिकारशाहीचा भरपूर परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहे असंही त्यांनी सांगितलं आहे.

# केबल महागणार महिना ५००₹ मोजावे लागणार

**मुंबई** - 'ट्राय'च्या नव्या नियमांनुसार येत्या १ जानेवारीपासून टीव्ही केबलसेवा घेणाऱ्यांना महिन्याला स्थिर आकार भाडे १३० रुपये द्यावे लागणार आहे. यात १०० चॅनल देण्यात येतील व त्यावरील प्रत्येक चॅनलसाठी ५० पैशांपासून ते १९ रुपये आणि त्यावर सेवाकर असा बोजा पडणार आहे. त्यानुसार सध्या पसंतीच्या असलेल्या चॅनलची संख्या लक्षात घेता ग्राहकाला 'केबल'साठी दरमहा किमान ५०० रुपये मोजावे लागणार आहेत.

# जम्मू-काश्मीरच्या पुंछमध्ये बस दरीत कोसळली, ११ प्रवाशांचा मृत्यू

**जम्मू-काश्मीर** – पुंछ सेक्टरमध्ये शनिवारी सकाळी एक बस दरीत कोसळून ११ जणांचा मृत्यू झाला आहे. मंडी इथं जाणारी ही बस शेकडो फूट खोल दरीत कोसळली. एनआयए या वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, प्रवाशांनी भरलेली ही बस मंडी इथं जात होती.



बसचालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला. या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला तर ३४ जण गंभीर जखमी आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळाल्यानुसार घटनास्थळी पोलीस आणि रुग्णवाहिका पोहोचल्या.जखमींना मंडी येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)